


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २७ वा मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# आधी ठाकरेंना सोडलं, आता स्वाभिमानी निर्णय, कोल्हापूरच्या माजी आमदाराचा मोठा झटका...

**वृत्तसंस्था/ कोल्हापूर**

विधानसभा निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळालेल्या भरघोस यशानंतर आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीपूर्वी पक्षात जोरदार इन्कमिंग सुरु झाले आहे. याशिवाय महाविकास आघाडीतील नेत्यांना आपल्याकडे ओढण्यासाठी राज्यात ऑपरेशन टायगर सुरु असल्याचीही जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच आता शिंदे कोल्हापुरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेला मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे. निवडणुकांच्या तोंडावर उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र करून स्वाभिमानी शेतकरी संघटनेसोबत केलेले माजी आमदार सुजित मिंचेकर हे शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. येत्या दोन ते तीन दिवसात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश होणार असल्याची माहिती देखील मिळत आहे. यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला आणि राजू शेट्टींना जोरदार धक्का मानला जात आहे. शिवसेना ठाकरे गटकडून हातकणंगले विधानसभा मतदारसंघातून लढण्यास इच्छुक असलेले माजी आमदार सुजित मिंचेकर यांना तिकीट मिळाले नाही. यामुळे ऐन वेळेला ठाकरे यांना जय महाराष्ट्र करत मिंचेकर राजू शेट्टी यांच्यासोबत गेले. तिसऱ्या आघाडीतून उमेदवारी घेऊन निवडणूक लढवली, मात्र त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. शिवाय राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना देखील पहिल्यासारखी ताकदीने उभी नाही. अनेक जुने निष्ठावंत कार्यकर्ते राजू शेट्टी यांच्या बदलत्या भूमिकेमुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला रामराम ठोकत आहेत. तर राज्यात सध्या एकनाथ शिंदे यांचा पक्ष सत्तेत असल्याने शिंदेंसोबत गेलं, तर फायदा असल्याने माजी आमदार सुजित मिंचेकर यांनी शिंदे गटाची वाट धरली आहे. येत्या २७ फेब्रुवारी रोजी मुंबईमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सुजित मिंचेकर पक्षप्रवेश करणार आहेत. याला स्वतः सुजित मंचेकर यांनीच दुजोरा दिला आहे. काल शिंदेंच्या शिवसेनेकडून कोल्हापूर जिल्ह्यात शिवकार्य अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. या बैठकीनंतर माजी आमदार सुजित मिंचेकर आणि खासदार धैर्यशील माने यांच्यात देखील चर्चा झालीय. मात्र शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत असताना दुसऱ्या बाजूला राजू शेट्टी यांच्याशी अद्याप कोणतीही चर्चा झाली नसल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. यामुळे राजू शेट्टी यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.




माजी आमदार सुजित मिंचेकर हे २००९ व २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेकडून हातकणंगले मतदारसंघातून विजयी झाले होते. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसचे नेते माजी आमदार राजुबाबा आवळे यांनी त्यांचा पराभव केला. त्यानंतर राज्यात झालेल्या शिवसेनेतील दुफळीनंतर अनेक महिने मिंचेकर यांच्या भूमिकेबद्दल अनेक चर्चा पाहायला मिळाल्या मात्र अखेर मिंचेकर यांनी ठाकरे गटासोबत राहण्याचा निर्णय घेतला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जागा वाटपात हातकणंगलेची जागा काँग्रेसला गेल्याने मिंचेकर यांनी स्वाभिमानीतून उमेदवारी घेतली. यावेळी देखील स्वाभिमानी पक्षात मोठ्या प्रमाणात नाराजीचा सूर पाहायला मिळाला. राजू शेट्टी यांनी रात्रीतून बदललेली भूमिका यामधून जिल्हाध्यक्ष वैभव कांबळे यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची अवस्था पाहता शिवाय पुढील राजकीय भवितव्याची चिंता पाहता माजी आमदार सुजित मिंचेकर यांनी पुढील राजकीय दिशा ठरवली आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबत शिवसेनेत जाण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शांत बसून राहण्यापेक्षा ऍक्टिव्ह राहणं चांगलं म्हणून हा निर्णय घेतोय. येत्या २७ तारखेला मुंबईत पक्षप्रवेश करण्याचा प्रयत्न आहे. अद्याप राजू शेट्टी यांच्यासोबत कोणतेही चर्चा झालेली नाही, अशी प्रतिक्रिया सुजित मिंचेकर यांनी एक वृत्तवाहिनीशी बोलतांना सांगितले आहे

# सैलानी यात्रेवर पाणीटंचाईचे मोठे सावट!

**जनसंचलन/बुलढाणा**

धार्मिक एकतेचे प्रतीक असलेल्या सैलानी बाबांच्या यात्रेला ८ मार्चपासून प्रारंभ होत असला, तरी यंदा या यात्रेवर पाणीटंचाईचे सावट राहण्याची शक्यता आहे. जवळपास १२५ वर्षांची परंपरा असलेली ही यात्रा राज्यासह देशभर प्रसिद्ध आहे. सैलानी हे पिंपळगाव सराई गटग्रामपंचायतीअंतर्गत येते. सध्या सैलानी, पिंपळगाव सराई आणि लगतच्या ढासाळवाडीसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव पंचायत समितीस्तरावर विचाराधीन आहे. त्या पार्श्वभूमीवर यात्रेदरम्यान पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



दुसरीकडे, बुलढाणा तालुक्यात ९६ गावे आहेत. टंचाई निवारणाच्या दुसऱ्या टप्प्यात तालुक्यातील काही गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. अजिंठा पर्वतरांगांमध्ये मुख्यतः बुलढाणा तालुका वसलेला असल्यामुळे टंचाई जानवते.



# मंजिल-ए-मिम: अवतार मेहरबाबा!

## संपादकीय लेख

_दि.१० जुलै १९२५पासून आपल्या जीवनातील शेवटच्या श्वासापर्यंत मेहेरबाबांनी मौन धारण केले. आपले अनुयायी आणि अन्य लोक यांच्याशी त्यांनी हातवारे करून तसेच फलकावर शब्दांचा उपयोग करून संवाद साधला. जाती-धर्माचा भेद न बाळगता मेहेरबाबांनी गरीब, मानसिक आजार आणि संसार तापांनी त्रस्त रुग्णांसाठी आश्रम, शाळा व दवाखाने हे विनामूल्य सुरु केले होते. चला तर मग, जयंतीनिमित्त जाणून घेऊया मेहेरबाबा यांच्या जीवनाचे पावन चरित्र श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दांत... संपादक.

हजरत बाबाजान या आध्यात्मिक महिलेशी भेट झाल्यांनतर मेहेरबाबा यांनी अन्य चार महान सद्गुरुंशी संपर्क साधला. त्यात ताजुद्दीन बाबा, नारायण महाराज, शिर्डीचे साईबाबा आणि उपासना महाराज यांचा समावेश होता. मेहेरबाबा यांच्यानुसार हे पाच गुरुश्रेष्ठ होते, की ज्यांच्यात ईश्वर साक्षात्कार प्राप्त आत्मा होता. त्यानंतर मेहेरबाबांनी कॉस्मोपॉलिटन क्लबची स्थापना केली, जे जगातील धर्मादाय संस्थांना पैसे देण्यास समर्पित होते. मेहेरबाबा हे बहुवाद्य वादक आणि कवी देखील होते. बऱ्याच भाषांमध्ये ते अस्खलितपणे बोलत. त्यांना विशेषत: शेक्सपियर आणि हाफिज यांच्या कविता फार आवडत असत. इ.स.१९२२मध्ये मेहेरबाबा आणि त्यांच्या अनुयायांनी बॉम्बे- आताचे मुंबई येथे मंजिल-ए-मीम-हाऊस ऑफ मास्टरची स्थापना केली. तेथे बाबांनी कठोर शिस्त आणि त्यांच्या शिष्यांना आज्ञाधारकता मागणी करण्याची प्रथा प्रारंभ केली. एका वर्षानंतर बाबा आणि त्यांची मंडळी अहमदनगर जवळील एका ठिकाणी गेले. ज्याचे नाव त्यांनी मेहेराबाद- आशीर्वादांचा बाग असे ठेवले. सन १९२०च्या दशकात बाबांचे हे आश्रम त्यांच्या कामाचे केंद्र बनले. पुढे मेहेराबादमध्ये त्यांनी शाळा व दवाखाना उघडले. ते त्यांनी सर्व जाती-धर्मांसाठी विनामूल्य खुले केले होते.

अवतार मेहेरबाबा यांचा जन्म दि.२५ फेब्रुवारी १८९४ रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात एका झोरास्ट्रियन कुटुंबात झाला. मेहेरबाबा यांचे मूळ नाव मेरवान शेरियार इराणी असे होते. सुरुवातीच्या काळात त्यांची आई व वडील इराणमध्ये राहायचे, नंतर ते भारतात स्थलांतरित झाले. त्यांचे वडील हे परमेश्वराचे अस्सल साधक होते. अध्यात्म श्रेणीरचनाद्वारे त्यांना सांगण्यात आले होते, की साक्षात्कार होऊन देव त्यांच्या पुत्ररूपात त्यांच्याकडे येईल. यासोबतच जन्म झाला तो म्हणजे एका महान अध्यात्मिक गुरु अवतार मेहेरबाबांचा. जन्मानंतर मेहेरबाबांनी आपले शालेय शिक्षण ख्रिश्चन हायस्कूलमध्ये केले असून डेक्कन कॉलेज मधून उच्च शिक्षण प्राप्त केले होते. डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतांना मेहेरबाबा यांची भेट हजरत बाबाजान म्हणजे एका अफगाणिस्थानी वृद्ध महिलेशी झाली. जी पुण्यातील एका रोडवर असलेल्या निंबाच्या झाडाखाली रहायची. त्याकाळात हजरत बाबाजान यांची अध्यात्मिक गुरु म्हणून प्रसिद्धी होती. मेहेरबाबा यांच्यानुसार हजरत बाबाजान या ईश्वर साक्षात्कार प्राप्त आत्मा होत्या. त्या पाच महान सद्गुरुंपैकी एक होत्या. हजरत बाबाजान यांनी मेहेरबाबा यांच्या कपाळाचे चुंबन घेऊन त्यांच्या मनात आध्यात्मिक प्रवृत्ती जागृत केली होती.

मेरवान शेरियार इराणी अर्थातच अवतार मेहेरबाबा हे भारतातील गूढवादी, धार्मिक आणि अध्यात्मिक गुरु होते. वयाच्या ६०व्या वर्षी त्यांनी घोषित केले, की ते या युगातील ङ्कअवतारफ आहेत. अवतार म्हणजेच स्वर्गात राहत असणारे देव पृथ्वीवर मनुष्याचा जन्म घेतात. दि.१० जुलै १९२५पासून आपल्या जीवनातील शेवटच्या श्वासापर्यंत मेहेरबाबांनी मौन धारण केले. आपले अनुयायी आणि अन्य लोक यांच्याशी त्यांनी हातवारे करून तसेच फलकावर शब्दांचा उपयोग करून संवाद साधला. जाती-धर्माचा भेद न बाळगता मेहेरबाबांनी गरीब, मानसिक आजार आणि संसार तापांनी त्रस्त रुग्णांसाठी आश्रम, शाळा व दवाखाने हे विनामूल्य सुरु केले होते. जुलै १९२५मध्ये धारण केलेल्या मौनी वृत्तीप्रमाणे मेहेरबाबा हे आपल्या जीवनातील शेवटच्या क्षणापर्यंत शांत राहिले. दि.३१ जानेवारी १९६९ रोजी या महान गूढवादी आणि अध्यात्मिक गुरुचे निधन झाले.

!! पावन जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली आणि टाटा समूहाचे नावलौकिक करत एका उंच स्थानावर नेऊन ठेवले. देशात दिडशे पेक्षा जास्त कंपन्या, आठ लाखाहून अधिक कामगार टाटा समूहामध्ये काम करत आहेत. दिनांक २८ डिसेंबर २०१२ रोजी त्यांच्या ७५ व्या जन्मदिना निमित्त त्यांनी टाटा समूहाच्या चेअरमन पदावर राजीनामा दिला. रतन टाटा यांची यशस्वी झालेली वाटचाल मी आपणासमोर ठेवली. रतन टाटा यांच्या वैयक्तिक जीवना बद्दल काही गोष्टी आपल्यासमोर मांडणार आहे. रतन टाटा यांनी लग्न केलेले नाही. सर्वसाधारण सरळ,साधं जीवन जगायला त्यांना आवडते, मुंबईमध्ये एका साध्या घरात ते राहत आहेत. त्यांना पुस्तके वाचण्याचा छंद आहे. तसेच ते प्राण्यांमध्येही चांगले रमतात. सामाजिक भान ठेवत, जपत टाटा समूह आपल्या नफ्यातील ६६% नफादान करते, रतन टाटा यांना बऱ्याच पुरस्काराने गौरवण्यात आले ज्यामुळे २००० साली पद्मभूषणाने व २००८ मध्ये भारतातील दुसरा मोठा पुरस्कार पद्मविभूषण हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## राज्यस्तरीय सेमिनार मध्ये गो. से. महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.दिव्या मुन्हेकर यांना तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस.

**जनसंचलन/ खामगाव**

श्री.शिवाजी कॉमर्स, आर्ट सायन्स कॉलेज अकोला येथे राज्यस्तरीय सेमिनार दिनांक १५/०२/२०२५ रोजी मॅथेमॅटिकल सायंसेस या विषयावर आयोजित करण्यात आला होता. राज्यभरातून विविध महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विविध विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, फिजिक्स, कम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स, सांख्यिकी शास्त्र या विषयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. गो. से. महाविद्यालयातील शुभम पारखे, अभय नुपनारायण, विशाल पवार, कु. श्रुतिका चव्हाण, कु. दिव्या मुन्हेकर या पाच विद्यार्थ्यांनी या राज्यस्तरीय सेमिनार मध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये कुमारी दिव्या मुन्हेकर बीएससी भाग २ हिने टेक्नॉलॉजी या विषयावर प्रकाश गतीने डाटा वायरलेस ट्रान्सफर कसा होतो याविषयीचा अभ्यास प्रस्तुत सेमिनारमध्ये विस्तृतपणे सेमिनार सादर केला. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने उल्लेखनीय मांडणी करून आपल्या अभ्यासाची छाप या सेमिनारमध्ये पाडली. तिला यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत इलेक्ट्रॉनिक्स या विषयात तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले यात तिला कॅश प्राईझ १५०१, मेमॉन्टो आणि सर्टिफिकेट देऊन सत्कार करण्यात आला. त्याबद्दल संस्थेचे मा अध्यक्ष डॉ. सुभाषजी बोबडे, सचिव डॉ. प्रशांतजी बोबडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर, यांनी तिने संपादन केलेल्या यशाबद्दल अभिनंदन व कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांना व्यवस्थित मार्गदर्शन मिळाल्यास काही संशोधनात्मक गोष्टी पुढे येऊ शकतात. अनेक विद्यार्थी आपल्या विषयात अभ्यासपूर्ण रूची दाखवतात विज्ञान प्रदर्शनी, सेमिनार, नाविन्यपूर्ण उपक्रम यामध्ये सहभाग घेऊन महाविद्यालयाचा लौकिक वाढवतात याचा अभिमान संस्थेला आहे. विषय मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या कल्पक बुद्धीला दिशा देण्याचे काम केल्यास असे यश संपादन करता येते. असा विश्वास माननीय प्राचार्यांनी तिचे कौतुक करताना व्यक्त केला. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. के. के. पठाण, डॉ. जे. एस.तातेड, प्रा. आय. जे. कराळे, डॉ. वाय. एस. म्हैसागर, श्री अंकुश माळवंदे आदींनी तिचे भरभरून कौतुक केले आहे. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

## इंजि. देगलूरकर, पत्रकार गंगासागरे आणि गंगाधर सोनटक्के यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान !

**वृत्तसंस्था/ आदिलाबाद**

नांदेड येथील सुप्रसिद्ध साहित्यिक, सामाजिक नेते व प्रखर वक्ते इंजि. चंद्रप्रकाश गंगाधरराव देगलूरकर, भोकर येथील ज्येष्ठ पत्रकार रमेश गोविंदराव गंगासागरे आणि अर्धापूर तालुक्यातील लोणी बु. येथील पत्रकार गंगाधर घन:श्याम सोनटक्के यांना तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील प्रतिष्ठेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले.

संत रविदास समाज सेवा मंडल आदिलाबाद आणि अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य आणि संस्कृती संवर्धन महामंडळातर्फे गुरु रविदास जयंतीनिमित्त आयोजित गुरु रविदास फेस्टिव्हलमध्ये विविध साहित्यिक, वैचारिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले, त्यात पत्रकार, साहित्यिक व कलावंतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास तेलंगणाचे माजी मंत्री जोगू रामन्ना, सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी प्रशांत वंजारे, डॉ. राजू रामेकर, डॉ. अल्का संजय गव्हाळे, माळी महासंघाचे अध्यक्ष सुकुमार पेटकुले, मनोज छापानी (अमरावती) आदींची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय कवी मधू बावलकर यांनी या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले.

इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी सामाजिक कार्याच्या माध्यमातून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली तर पत्रकार रमेश गंगासागरे आणि गंगाधर सोनटक्के यांनी ग्रामीण भागातून पत्रकारिता सुरु करुन गोरगरीबांना नावलौकीक व न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे अल्पावधीतच त्यांनी पत्रकारितेत नाव मिळविले. या सर्वांच्या या कार्याची दखल तेलंगणा राज्यात घेण्यात आली व अत्यंत प्रतिष्ठेचा




असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार मानसन्मानाने प्रदान करण्यात आला. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# एकनाथ शिंदे यांचं महाकुंभ मेळ्यात शाही स्नान...

## योगींचं कौतुक करत म्हणाले, कोट्यवधी लोक आले, मात्र सगळ्यांना...



**प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्नी लता शिंदे यांच्यासह महाकुंभ मेळाव्यात शाही स्नान केले. यावेळी मंत्री उदय सामंत, मंत्री दादा भुसे आणि मंत्री भरत गोगावले, मंत्री गुलाबराव पाटील यांनीही शाही स्नान केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की महाकुंभ हा सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाचे केंद्र आहे. प्रयागराज ही पवित्र भूमी आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा हा संगम आहे. या पवित्र संगमस्थळी स्नान केले की जीवनाचे सार्थक होते, अशी लोकांची श्रद्धा आहे. १४४ वर्षांनंतर होणारा महाकुंभ अद्भुत आहेत. कोट्यवधी लोक येथे येऊन गेलेत, मात्र सगळ्यांना समान वागणूक मिळाली. येथे कोणीही लहान मोठे नाही. ५० कोटीहून अधिक लोकांनी कुंभ स्नान केले, हा एक विश्वविक्रम आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. प्रयागराज येथील महाकुंभाची व्यवस्था उत्तम केल्याबद्दल उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे शिंदे यांनी कौतुक केले.इथे येणारा प्रत्येक भाविक सकारात्मक ऊर्जा घेऊन जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभ मेळ्याचे उत्तम नियोजन केले. मागील दीड महिना न थकता योगीजी आणि त्यांच्या टीमने महाकुंभ मेळ्याची चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली.आतापर्यंत ६० कोटी लोकांनी महाकुंभात स्नान केले. अर्थात भारताच्या निम्म्या लोकांनी गंगा स्नान केले आणि गंगा नदीचे जल घरी घेऊन गेले. गंगेचे पवित्र जल आणि महाकुंभाची सकारात्मक ऊर्जा देशातील घराघरात पोहोचेल आणि देश प्रगती करेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केल. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याबरोबरच आध्यात्मिक परंपरेला पुढे नेण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ करत आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# मी कुणाचा सत्कार करायचा याबाबत परवानगी घ्यावी लागत असेल तर...

## शरद पवारांचं संजय राऊतांना प्रत्युत्तर




**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते दिल्लीत महादजी शिंदे राष्ट्रगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. पण यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आक्षेप घेतला होता. शरद पवारांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आल्याने संजय राऊतांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. संजय राऊतांच्या नाराजीबाबत आज शरद पवार यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी आपली रोखठोक भूमिका जाहीर केली. मी कुणाचा सत्कार करायचा की नाही करायचा, या विषयी परवानगी घ्यावी लागत असेल तर हरकत नाही. मी लक्षात ठेवेन, असं शरद पवार म्हणाले. तसेच एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे पुरस्काराने गौरवण्यात आलं. पण तो कार्यक्रम साहित्य संमेलनातला नव्हता तर तो वेगळा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाचा साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमाशी संबंध नव्हता, असं शरद पवार यांनी यावेळी स्पष्ट केलं. साहित्य संमेलनाचा व्यासपीठाचा वापर राजकीय आरोप-प्रत्यारोपासाठी झाला हा आरोप आपल्याला मान्य आहे का? असा प्रश्न शरद पावरांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी मला मान्य नाही असं उत्तर दिलं. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या वक्तव्यावरुन संजय राऊत यांनी शरद पवारांवरही टीका केली. याबाबत शरद पवारांना प्रश्न विचारला असता, मी संमेलनाचा स्वागताध्यक्ष होतो म्हणून त्यांना माझ्यावर जबाबदारी टाकायची असेल तर माझी काही तक्रार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.शरद पवार यांनी यावेळी नीलम गोऱ्हे यांच्यावरही निशाणा साधला. नीलम गोऱ्हे यांच्या विधानाबाबत स्पष्ट सांगायचं झालं तर मुर्खपणाचं होतं. यापेक्षा जास्त काही बोलायची आवश्यकता नाही, अशी टीका शरद पवारांनी केली.मंत्री धनंजय मुंडेंनी नैतिकतेच्या मुद्द्यावर राजीनामा दिला पाहिजे का? असा प्रश्न शरद पवारांना विचारण्यात आला. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. नैतिकता आणि या सगळ्या लोकांचा काही संबंध आहे, असं मला जाणवत नाही. त्यामुळे कशावर त्यावर भाष्य करायचं?, असा सवाल शरद पवारांनी केला. तुम्हा सगळ्यांना ठाऊक आहे, गेले ३ दिवस दिल्लीत मराठी साहित्य संमेलन सुरु होतं. ते दोन टप्प्यात होतं. त्याचा पहिला भाग हा उद्घाटनाचा होता. त्यावेळी प्रमुख पद हे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना होतं. त्यानंतर चार टप्प्यामध्ये वेगवेगळी कार्यक्रम पार पडली. साहित्य परिषदेने नव्या अध्यक्षा तारा भवाळकर यांच्या नेतृत्वात साहित्य संमेलन आयोजित केलं होतं. सुदैवाने हे दोन्ही कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाले. पंतप्रधानांचा कार्यक्रम वेगळ्या ठिकाणी होता. नंतरचे तीन कार्यक्रम दुसऱ्या ठिकाणी झाले, असं शरद पवार म्हणाले. पंतप्रधानाच्या कार्यक्रमाला सभागृह भरलेलं होतं. तसेच उर्वरित कार्यक्रमांनादेखील चांगला प्रतिसाद होता. साधारणतः साहित्य संमेलन म्हटल्यावर काही ना काही वाद हे असतातच. पण हे अधिवेशन अतिशय यशस्वी झालं, अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली. हे अधिवेशन दिल्लीत दुसऱ्यांदा होतं. दिल्लीत पहिलं अधिवेशन झालं त्याचं नेतृत्व त्यावेळचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी केलं होतं. त्याचे स्वागताध्यक्ष त्यावेळचे केंद्रीय मंत्री काकासाहेब गाडगीळ होते. या वेळेला उद्घाटनाची जबाबदारी पंतप्रधान मोदी यांच्यावर होती. तर स्वागताध्यक्षाची जबाबदारी माझ्यावर आहे. मराठी रसिक, मराठी अधिकारी अशी अनेकांची तिथे उपस्थिती होती, असंदेखील शरद पवार यावेळी म्हणाले.

# महामुकाबल्यात बुमराह दिसला; मैदानात भारताच्या लकी चार्मची झाली अचानक एन्ट्री

**दुबईः** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा ५वा सामना भारत आणि पाकिस्तान या संघांमध्ये खेळला जाईल. क्रिकेट चाहते या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. दोन्ही संघांमधील हा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये होईल. दोन्ही संघांसाठी हा सामना खूप महत्त्वाचा आहे. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी पाकिस्तानला कोणत्याही परिस्थितीत टीम इंडियाला हरवावे लागेल. त्याच वेळी, टीम इंडिया उपांत्य फेरीत आपले स्थान पक्के करण्यावर लक्ष केंद्रित करेल. दरम्यान, टीम इंडियाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने त्याच्या चाहत्यांना एक मोठी भेट दिली आहे. जसप्रीत बुमराह २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीचा भाग नाही. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील शेवटच्या सामन्यात बुमराहला दुखापत झाली होती, त्यानंतर त्याला विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला



होता. ज्यामुळे त्याची २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी निवड झालेली नाही. जसप्रीत बुमराह त्याच्या पाठीच्या दुखापतीमुळे त्रस्त आहे, त्यामुळे तो बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये तंदुरुस्त होण्याचा प्रयत्न करत आहे. दरम्यान, जसप्रीत बुमराह भारत-पाकिस्तान सामना पाहण्यासाठी दुबईला पोहोचला आहे.

भारत आणि पाकिस्तानच्या संघांमध्ये क्रिकेटच्या मैदानावर एक वेगळीच लढाई पाहायला मिळते. क्रिकेटमधील ही सर्वात मोठी स्पर्धा मानली जाते. हे दोन्ही संघ फक्त आयसीसी स्पर्धा आणि आशिया कपमध्येच एकमेकांशी भिडतात, त्यामुळे चाहते नेहमीच या दोन्ही संघांमधील सामन्यांची वाट पाहत असतात. कोणीही हा सामना चुकवू इच्छित नाही. हा मोठा सामना पाहण्यासाठी जसप्रीत बुमराह देखील मैदानावर पोहोचला आहे. जसप्रीत बुमराहच्या दुखापतीची तपासणी करण्यासाठी स्कॅनही करण्यात आला. स्कॅन रिपोर्ट पाहिल्यानंतर एनसीएने सांगितले की,ङ्क कोणतीही समस्या नाही. पण बोर्डाला चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये बुमराहला खेळवून कोणताही धोका पत्करायचा नव्हता.ङ्क मीडिया रिपोर्ट्सनुसार, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ त्याला कसोटी संघाचा कर्णधार म्हणून पाहत आहे. तो इंग्लंड दौऱ्यावर संघाचे नेतृत्व करताना दिसण्याची शक्यता आहे. बीसीसीआयने सध्या त्याला मैदानात उतरवण्याचा निर्णय न घेण्याचे हे देखील एक मोठे कारण आहे.

# शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश

**मुंबई**

राज्यातील सर्वच शिव पाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करा, अशी सूचना प्रशासनाला देतानाच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट आदेश दिले आहेत.


शिव पाणंद आणि शेत रस्ते समृद्ध करण्याबाबत पब्लिक डोमेनच्या माध्यमातून नागरिकांच्या सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. पाणंद रस्ते, शेतरस्ते, सार्वजनिक वहीवाटीच्या रस्त्यांच्या मोजणी आणि पोलीस संरक्षणासाठी असलेली फी बंद करण्याचा विचार



करण्यात येईल असे सांगून बावनकुळे म्हणाले, अशा रस्त्यांच्या नंबरींगचे सर्वेक्षण करून नंबरिंग हटवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. रस्त्यांच्या प्रकरणी तहसीलदारांच्या निर्णयावर उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अपील केल्यानंतर त्यांनीच अंतिम निकाल देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे सांगून बावनकुळे यांनी शेतरस्त्यांचा उल्लेख झाल्याशिवाय वाटप पत्र मंजूर करण्यात येऊ नये यासाठीही शासन सकारात्मक असल्याचे सांगितले.

# उंदरांना न मारता पळवून लावण्याचा सिंपल उपाय, पुन्हा कधी घरात दिसणारा नाही...











घरात उंदीर येण्याची समस्याही खूप मोठी आहे. अनेकदा उंदीर बाहेरील गटारांमधून घरात घुसतात आणि दहशत निर्माण करतात. लहान आकाराचे उंदीर फक्त वस्तू आणि कपड्यांचे नुकसान करतात, तर मोठे उंदीर अनेकदा अन्न आणि पेयांचे जास्त नुकसान करतात आणि बहुतेकदा रात्री घरात प्रवेश करतात. जर तुम्हाला उंदरांच्या वारंवार येण्याचा त्रास होत असेल तर ही गोळी तयार करा आणि घराच्या कोपऱ्यात आणि दारात ठेवा. उंदीर पुन्हा कधीही परत येणार नाहीत. तुमच्या घरातही उंदीर दहशत निर्माण करत आहेत का? जर हो, तर हा लेख तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. हे लक्षात घेण्यासारखे आहे की घरात असलेले उंदीर आजारांचा धोका वाढवतात. याशिवाय, ते सोफा, विजेच्या तारा, कपडे इत्यादी महागड्या वस्तू दातांनी चावून खूप नुकसान करतात. अशा परिस्थितीत, जर तुम्हीही उंदरांच्या या दहशतीने त्रस्त असाल तर हा लेख तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. या सोप्या गोष्टींचा वापर करून तुम्ही देखील या समस्येपासून सुटका मिळवू शकता.

**पुदिन्याच्या मदतीने घरातून उंदीर हाकलून लावा**

उंदीर न मारता घरातून हाकलून लावायचा असेल तर पुदिना मदत करू शकतो. उंदरांना त्याचा वास आवडत नाही. अशा परिस्थितीत, घरात किंवा इतर ठिकाणी उंदीर जास्त दिसतात अशा ठिकाणी ठेवा. मग उंदीर घराबाहेर पळून जाऊ शकतो. या उपायाने घर देखील सुगंधाने बहरून जाईल.

**लाल मिरचीच्या वापरकरून उंदिर जातील पळून**

उंदरांनाही लाल मिरची आवडत नाही ज्यामुळे तोंडात जळजळ होते. उंदीर ज्या ठिकाणी फिरतात त्या ठिकाणी तिखट शिंपडल्याने उंदीर पुन्हा येण्याची हिंमत करत नाहीत. पण जर घरात मुले असतील तर हा उपाय टाळावा.

**कांद्यासोबत लसूण स्प्रे**

कांदा आणि लसूण स्प्रे तुमच्या घरातून उंदीर घालवण्यास देखील मदत करू शकतो. यासाठी कांदा आणि लसूण रस एका स्प्रे बाटलीत भरा. आता त्यात थोडे पाणी घाला. पाणी आणि रस मिसळण्यासाठी बाटली चांगली हलवा. आता ते घराच्या प्रत्येक कोपऱ्यात शिंपडा. असे केल्यानंतरही उंदीर पळून जातात. कपूरच्या वासाने उंदीर जातील पळून पूजेमध्ये वापरला जाणारा कापूर उंदरांपासून मुक्त होण्यासाठी देखील उपयुक्त ठरू शकतो. यासाठी तुम्ही घराच्या कोपऱ्यात किंवा इतर ठिकाणी कापूरच्या गोळ्या ठेवू शकता. उंदरांपासून येणाऱ्या तीव्र वासामुळे त्यांचा गुदमरायला सुरुवात होते. अशा परिस्थितीत ते स्वतः त्या ठिकाणी जाणे टाळू लागतात.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# औरंगजेबाच्या लाडक्या लेकीचं पुढे काय झालं? बापाकडे मागितलेला हुंडा अन्...



**मुंबई** - विकी कौशलच्या छावा सिनेमाची चर्चा जोरदार सुरू आहे. हा सिनेमा प्रदर्शित होऊन एक आठवडा उलटून गेला असला तरी या सिनेमाला प्रेक्षकांचं भरघोस प्रेम मिळतंय. या सिनेमामध्ये विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली असून अक्षय खन्नाने औरंगजेबाची भूमिका साकारली आहे. त्याचबरोबर औरंगजेबसोबत सतत दिसणाऱ्या डायना पेंटीने झीनत-उन-निसा बेगमची भूमिका साकारली आहे. पण झीनतचं आयुष्य कसं होतं? आणि शेवटी तिचं काय झालं? जाणून घेऊया. झीनतची भूमिका चित्रपटात क्रूर दिसत असली तरी, तिच्या खऱ्या आयुष्याची कथा अनेकांना माहित नव्हती. छावामुळे ही ऐतिहासिक व्यक्तिरेखा पुन्हा चर्चेत आली आहे. झीनत-उन-निसा बेगमचा जन्म ५ ऑक्टोबर १६४३ रोजी, कदाचित औरंगाबाद येथे झाला. ती मुघल सम्राट औरंगजेब आणि त्याची मुख्य पत्नी दिलरस बानो बेगम यांची कन्या होती. तिची आई पर्शियन राजघराण्यातील होती. त्यामुळे झीनतच्या शाही शिक्षणावर भर देण्यात आला. तिच्या वडिलांनी तिला पादशाह बेगम ही प्रतिष्ठित पदवी दिली होती. झीनत इस्लामी शिक्षणात पारंगत होती आणि तिने अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला. ती आपल्या वडिलांसोबत कायम राहायची. झीनत-उन-निसा तिच्या धाकट्या सावत्र भावाला - मुहम्मद काम बख्श याला पाठिंबा देत असे. त्यामुळे तिच्या मोठ्या भावांशी तिचं पटायचं नाही. ती औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत त्याच्यासोबत होती. १६८१ पासून औरंगजेबने दख्खनमधील मोहिमा सुरू केल्या. त्याच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात झीनत त्याच्यासोबत होती. लाल किल्ल्यात तिने अनेक महत्वाच्या निर्णयांमध्ये सहभाग घेतला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतरही ती शाही दरबाराचा एक महत्वाचा भाग राहिली.झीनत-उन-निसाने चौदा मोठे कारवांसेराय म्हणजे विश्रांतीगृह बांधलं होतं. विशेषतः बंगाल ते अवध मार्गावर तिने धर्मशाळा उभारल्या. तिच्या सेवाभावी कार्यामुळे औरंगजेबानेही तिची प्रशंसा केली होती. १७०० मध्ये तिने दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झीनत -उल-मसाजिद नावाची भव्य मशीद बांधली. त्यांच्या परंपरेनुसार, तिने औरंगजेबाकडून हुंड्याची रक्कम मागून ही मशीद बांधली होती.झीनत-उन-निसाचा मृत्यू १८ मे १७२१ रोजी, वयाच्या ७७व्या वर्षी दिल्ली येथे झाला. तिच्या मृत्यूनंतरही तिच्या कामाची आठवण दिल्लीत टिकून राहिली. झीनत-उल-मसाजिद ही मशीद आजही तिच्या आठवणी जपते. झीनत-उन-निसा ही फक्त औरंगजेबाची मुलगी नव्हती, तर ती एक हुशार आणि औरंगजेबाच्या धोरणांचा विचार करणारी होती.

# राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

सोमवार दि. ३ ते २६ मार्च २०२५ या कालावधीत मुंबईत होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प १० मार्चला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येणार आहे. विधानसभा व विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशन कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. विधानभवन, मुंबई येथे झालेल्या विधानसभा व विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी सार्वजनिक सुटीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, तर दि. १३ मार्च २०२५ रोजी होळीनिमित्त कामकाजास सुटी देण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीस मंत्री गिरीष महाजन, शंभुराज देसाई, आमदार सर्वश्री प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, ॲड.अनिल परब, हेमंत पाटील, श्रीकांत भारतीय, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, डॉ.नितीन राऊत, रणधीर सावरकर, अमिन पटेल, विधिमंडळ सचिव (१) जितेंद्र भोळे, सचिव (२) विलास आठवले यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या.

# लेकाचा सिनेमा फ्लॉप झाल्यानंतर बापाचं काळीज दुखावलं; म्हणाला, त्याने चांगलं काम केलंय पण...



**मुंबई** - बॉलिवूडचा सुपरस्टार आमिर खानचे अनेक सिनेमे सुपरहिट झाले आहेत. आमिरला मिस्टर परफेक्शनिस्ट म्हटलं जातं. आमिरचा मुलगा जुनैद खानने देखील सिनेविश्वात पदार्पण केलं आहे. मात्र वडिलांप्रमाणे त्याची जादू प्रेक्षकांवर चालली नाही.

काही दिवसांपूर्वी आमिर खानचा लेक जुनैद खानचा आणि श्रीदेवी यांची मुलगी खुशी कपूरचा लव्हयापा हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. पण हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. अशातच आता आमिरने अलीकडेच एबीपी नेटवर्क आइडियाज ऑफ इंडिया २०२५ मध्ये अनेक गोष्टींवर भाष्य केलं आहे. यावेळी त्याने लेकाच्या सिनेमाबद्दलही मत व्यक्त केलं.जुनैद खानचा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला त्यामुळे आमिर अत्यंत दुःखी झाला आहे. आमिर म्हणाला की, मला वाटतं की सिनेमा चांगला होता. जुनैदनेही चांगलं काम केलं. एक बाप म्हणून सिनेमाच्या रिलीजपूर्वी मी काळजीत होतो. त्या भावनेला मी शब्दात मांडू शकत नाही. सध्या जुनैद एका सिनेमाचं शूटिंग करतोय जो नोव्हेंबर किंवा डिसेंबरमध्ये रिलीज होईल. तो एक रोमँटिक सिनेमा आहे. असं म्हणत आमिरने लेकाच्या आणखी एका सिनेमाची हिंट दिली आहे.याच मुलाखतीदरम्यान आमिरखानने त्याच्या आगामी सितारे जमीन परबद्दल त्याचं मत व्यक्त केलं.

आमिरच्या म्हणण्यानुसार सितारे जमीन पर सिनेमा याच वर्षी २०२५ मध्ये जून किंवा जुलैमध्ये रिलीज होणार आहे. या सिनेमाच्या माध्यमातून आमिर विनोदी शैलीने अनेक महत्वाचे विषय घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमात आमिरसोबत अभिनेत्री जिनिलीया देशमुख झळकणार आहे. आमिरच्या चाहत्यांना या सिनेमाची उत्सुकता आहे.दरम्यान, जुनैद खान आणि खुशी कपूरच्या लव्हयापा या सिनेमाच्या कमाईबद्दल सांगायचं तर या सिनेमाने पहिल्या दिवशी १.१५ कोटींची कमाई केली होती.

तर दुसऱ्या दिवशी सिनेमाच्या कमाईत ४३.४८ टक्के वाढ झाल्याचं दिसून आलं. दुसऱ्या दिवशी सिनेमाने १.६५ कोटींची कमाई केली होती.

तर तिसऱ्या दिवशीही सिनेमाच्या कमाईत थोडी वाढ झाली होती. तिसऱ्या दिवशी सिनेमाने १.७५ कोटींची कमाई केली. चौथ्या दिवशी सिनेमाच्या कमाईत मोठी घट झाली, ही घट ६८.५७ टक्क्यांची होती.

# २५००० रुपये काढता येणार, आरबीआयकडून न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ग्राहकांना दिलासा

**मुंबई** : न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ग्राहकांना दिलासा देणारी एक मोठी बातमी आता समोर येत आहे. आरबीआयकडून ग्राहकांना आता २५ हजार रुपयांपर्यंत पैसे काढण्यास परवानगी देण्यात आली आहे. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्बंध लादली आहेत. तसेच बँकेचं संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलं आहे. याशिवाय नवीन कर्जवाटप आणि ठेवी काढण्यावर अचानक बंदी घालण्यात आली. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. आरबीआयच्या या कारवाईमुळे ग्राहक प्रचंड चिंतेत पडले आहेत. आरबीआयच्या या कारवाईनंतर ग्राहकांची मोठी गर्दी बँकेच्या बाहेर बघायला मिळत आहे. यानंतर आता आरबीआयने ग्राहकांना दिलासा देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांना आता २५ हजार रुपयांपर्यंतचे पैसे काढता येणार आहेत. आरबीआयने याबाबतची परवानगी दिली आहे. तसेच आरबीआयने नेमलेल्या बँकेच्या सल्लागार समितीतही बदल करण्यात आल्याची माहिती आता समोर येत आहे.आरबीआयने न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांना २७ फेब्रुवारी २०२५ पासून प्रती ठेवीदार २५ हजार रुपयांपर्यंत पैसे काढण्याची परवानगी दिली आहे. ठेवीदार हे बँकेच्या शाखेत किंवा एटीएमचा वापर करुन २५ रुपयांपर्यंतचे पैसे काढू शकणार आहेत. त्यामुळे बँकेच्या ठेवीदारांसाठी हा मोठा दिलासा आहे. या प्रकरणात जास्त पैशांची गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांना कधी दिलासा मिळतो? ते देखील पाहणं महत्त्वाचं आहे.न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेत १२२ कोटींचा गैरव्यहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून सातत्याने कारवाई सुरु आहे. गुन्हे शाखेने या प्रकरणी बँकेचा जनरल मॅनेजर हितेश मेहता याला अटक केली आहे. हितेश मेहताने बँकेच्या दादर आणि गोरेगाव येथील शाखेतून तब्बल १२२ कोटींचा गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी हर्षल मेहता याच्यासोबत धर्मेश पान आणि अभिमन्या भोन यांना अटक केली आहे. या तीनही जणांना २८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ये प्रयागराज है! सासूबाईसोबत महाकुंभ मेळ्यात पोहोचली कतरिना कैफ, म्हणाली आज माझ्या आयुष्यात हा दिवस...

**मुंबई:** प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यात गेल्या काही दिवसांत अनेक सेलिब्रिटींनी स्नान केलं. आता शेवटच्या काही दिवसांतही सेलिब्रिटींनी कुंभमेळ्यात गर्दी केली आहे. आता अभिनेत्री कतरिना कैफ देखील कुंभमेळ्यात गेली आहे. कतरिना तिच्यासासूबाई अर्थात विकी कौशलच्या आईसोबत प्रयागराज इथं गेली आहे. काही दिवसांपूर्वी विकी कौशलही कुंभमेळ्यात आला होता,त्यानं देखील पवित्र स्नान केलं होतं. आता पत्नी कतरिना देखील महाकुंभ मेळ्यात सहभागी झाली आहे. कतरिना प्रयागराज इथं दाखल झाल्यानंतर तिनं परमार्थ निकेतन शिबिर इथं स्वामी चिदानंद सरस्वती आणि साध्वी भगवती सरस्वती यांचे आशीर्वाद घेतले. कतरिना आणि तिच्या सासूबाईंनी साध्वी भगवती यांच्यासोबत संवादही साधला. यानंतर कतरिनानं एक वृत्तसंस्थेशी संवाद साधला. मी स्वत:ला खूप भाग्यवान मानते की, आज मी इथं येऊ शकले. मी प्रचंड खूष असून हा दिवस माझ्या आयुष्यात आला त्याबद्दल आभारी देखील आहे. मी चिदानंद सरस्वती यांची भेट घेतली, त्यांचा आशीर्वाद घेतला.

मी इथं एक वेगळा अनुभव घेत आहे. मला इथं एक वेगळ्या प्रकारची ऊर्जा दिसतेय, इथल्या प्रत्येक गोष्टीत एक सौंदर्य आहे, प्रत्येक गोष्ट सुंदर आहे. या प्रत्येत गोष्टीचं महत्व आहे, आजचा दिवस इथं घालवण्यासाठी मी उत्सुक असल्याचं कतरिनानं म्हटलं आहे. तर रविवारी अक्षय कुमार यानं देखील महाकुंभमध्ये स्नान केलं. अक्षय कुमारची एक झलक पाहण्यासाठी तिथं गर्दी झाली होती. अक्षयच्या आधी सिंगर कैलाश खेर,



अनुपम खेर, हेमा मालिनी, सोनाली बेंद्रे, राजकुमार राव आणि एकता कपूर सह अनेक टीव्ही आणि बॉलिवूड कलाकारांनी महाकुंभ मेळ्यात स्नान केलं आहे. दरम्यान, गेल्या काही वर्षात कतरिनानं मोजकं काम केलं आहे. कतरिना सध्या तिच्या संसारात रमली असून जास्तीत जास्त वेळ ती कुटुंबियांसोबत घालवताना दिसते. विकी कौशल याच्या छावा सिनेमाच्या स्क्रीनींगला ती दिसली होती.

## भारत-पाक मॅचवेळी राष्ट्रविरोधी घोषणा, भंगारव्यावसायिकाला पालिकेचा जेसीबीचा दणका

**सिंधुदुर्ग:** भारत पाकिस्तान मॅचकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या होत्या. या दरम्यान सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण येथे एक संतापजनक प्रकार घडल्याचा दावा केला जात आहे. मालवण येथे एका भंगार विक्रेत्याने राष्ट्रविरोधी घोषणा दिल्याचा दावा करण्यात येत आहे. या प्रकरणावरून आता शिवसेनेचे युवा नेते मालवणचे आमदार निलेश राणे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मालवणात एका मुस्लिम परप्रांतीय भंगार व्यवसायिकाने भारत पाकिस्तान मॅचनंतर भारत विरोधी घोषणा दिल्याचा आरोप करत त्याचे दुकान उध्वस्त करण्यात आले आहे. कारवाई म्हणून आम्ही या परप्रांतीय हरामखोराला जिल्ह्यातून हाकलून देणारच, पण त्या अगोदर तात्काळ त्याचा भंगार व्यवसाय उध्वस्त करून टाकला. मालवण नगर परिषद प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी ताबडतोब कारवाई केल्याबद्दल त्यांचे आभार, असे ट्विटही आमदार निलेश राणे यांनी केलं आहे.भारत पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीची लढत भारताने जिंकल्यावर सर्वत्र जल्लोष साजरा करण्यात आला. पाकिस्तानला धूळ चारून मिळवलेल्या या विजयाबद्दल



भारतीय टीमचे सर्वत्र कौतुक करण्यात आलं. सगळीकडे हा आनंदोत्सव फटाके फोडून साजरा करण्यात आला. रविवारी झालेली ही मॅच भारताने एकहाती जिंकली.

याच दरम्यान मालवणमधील काही मुस्लिम समाजाच्या तरुणांनी राष्ट्रविरोधी घोषणा देऊन वातावरण भडकवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला जात आहे. त्यावेळी मालवणातील सर्व हिंदू युवकांनी रात्री या देशद्रोहींना पोलिसांच्या स्वाधीन केले. दुपारी मालवण देऊळवाडा पुलावरून मोटरसायकल रॅलीने मालवण पोलीस स्टेशन येथे हिंदू समाजाच्यावतीने मोटार सायकल रॅली काढण्यात आली होती. त्यावेळी, परप्रांतीय भंगार व्यवसायिकाकडून भारत विरोधी घोषणा दिल्याचा प्रकार घडला. या संदर्भात तात्काळ म्हणून पोलिसांना याची माहिती देण्यात आली.

पोलिसांनी एका कुटुंबातील तिघांना ताब्यात घेतले आहे. चौकशी अंती एकाला अटक करण्यात आली आहे. यामध्ये एक अल्पवयीन असल्याने त्या कायद्यानुसार कार्यवाही सुरू आहे. परप्रांतीय भंगार व्यवसायिकाची बेकादेशीर झोपडी जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आली आहे. प्रशासनाने ही अनधिकृत झोपडी उध्वस्त केल्याबद्दल निलेश राणे यांनी ट्विट करून प्रशासनाचे आभार मानले आहेत. कारवाई म्हणून आम्ही या परप्रांतीय या भंगारविक्रेत्या हरामखोराला जिल्ह्यातून हाकलून देणारच असाही इशारा निलेश राणे यांनी दिला आहे.

## विराट २१ व्या षटकात आऊट होता, कोहलीने माफी मागितली

विराट कोहलीच्या प्रेमात सर्वच एवढे भारत-पाक सामन्यात न्हाहून निघाले होते की, २१ व्या षटकात बाद झाला होता हे कोणालाही समजले नाही. पाकिस्तानच्या खेळाडूंच्याही यावेळी ही गोष्ट लक्षात आली नाही. पण विराटला ही गोष्ट समजली होती आणि त्यानंतर त्याने लगेच मैदानात माफी मागितल्याचे पाहायला मिळाले आणि त्यामुळेच त्याला जीवदान मिळाल्याचे समोर आले. विराट वर्चस्वाची सुरुवात १४व्या षटकांत झाली होती. त्याने रौफला दोन कव्हर ड्राईव्हचे चौकार मारत काय घडणार याचे संकेत दिले होते. त्याने धावांचा पाठलाग करण्यात मास्टर असल्याचे दाखवले. त्याने वनडे म्हणजे चौकार, षटकारांची आतषबाजी नव्हे हे दाखवताना ४६ एकेरी आणि १३ दुहेरी धावा घेताना धावफलक हलता ठेवला. त्याला श्रेयसची मोलाची साथ लाभली आणि भारताचा विजय सोपा झाला.भारतीय डावातील २१व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर चोरटी धाव वेगाने पूर्ण करून झाल्यावर तो धावत असलेल्या यष्टींच्या दिशेने फेकलेला चेंडू आला होता. तो विराटने हातात पकडला. क्रिकेटच्या नियमानुसार तो क्षेत्ररक्षणात अडथळा असल्यामुळे बाद ठरू शकला असता. इंझमाम उल हक भारताविरुद्ध एकदा याच प्रकारे बाद झाला आहे. पाक संघाने विराटविरुद्ध कोणतेही अपील केले नाही. अर्थात विराटलाही त्याची चुक समजली. त्याने हात दाखवत माफीची खूण केली होती.विराट कोहलीने रविवारी पाकिस्तानच्या गोलंदाजांवर हल्ला करताना आपल्या बॅटने टीकाकारांनाही गप्प केले. त्याने भारतीय डावाच्या ४२व्या षटकातील तिसरा चेंडू पुढे येऊन एक्स्ट्रॉ कव्हरवरून सीमापार धाडत शतक पूर्ण केले; तसेच भारतास विजयीही केले होते. विराटच्या ५१व्या वनडे शतकाने भारताने चॅम्पियन्स करंडक वनडे क्रिकेट स्पर्धेतील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या सामन्यात एकतर्फी विजय मिळवला होता. भारताने तब्बल ४५ चेंडू आणि सहा विकेट राखून बाजी मारताना उपांत्य फेरीच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले.विराट कोहलीच्या या शतकाच्या जोरावर आता भारताने पाकिस्तानचा सामना जिंकला आहे. पण यानंतरच्या सामन्यांमध्ये विराट कोहलीचा फॉर्म कायम राहतो की नाही, याकडे आता सर्वांचे लक्ष असणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य; १० मार्चपर्यंत अर्जाची मुदत

जनसंचलन/बुलढाणा

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, अकोला कार्यालयाच्या जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम योजनेंतर्गत पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुदान किंवा अर्थसहाय्यासाठी पारधी, फासेपारधी समाजाच्या लाभार्थ्यांनी दि. २४ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेचे छापील अर्ज विनामुल्य लाभार्थ्यांना देण्यात येईल. तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अकोला या कार्यालयास अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १० मार्चपर्यंत असून या मुदतीपर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. योजना : पारधी समाजाच्या दारिद्र रेषेखालील लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर शेळीपालन व्यवसायकरिता ५ शेळी १ बोकडे खरेदी करीता अर्थसहाय्य करणे, या योजनेंतर्गत डीबीटीव्दारे लाभ दिले जातील. २. पारधी समाजाच्या दारिद्र रेषेखालील लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर कुकरीज (डीनर सेट) व्यवसायाकरिता अर्थसहाय्य करणे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे : पारधी व फासेपारधी जमातीचा दाखला प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक खाते क्रमांक व आयएफएससी कोड, दारिद्रेरेषेचे कार्ड असल्यास, तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, रेशनकार्ड, पासपोर्ट फोटो, विधवा असल्यास प्रमाणपत्र सादर करावे, दिव्यांग प्रमाणपत्र,परितक्ता प्रमाणपत्र असल्यास सादर करावे, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांनी केले आहे.

# डाक जीवन विमा योजनेचे प्रीमिअम भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय डाक विभागामार्फत डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा या योजना नागरिकांना विमासुरक्षा देण्याकरिता चालविल्या जातात. विमा योजनांचे प्रीमिअम भरण्यासाठी विमाधारकांनी ऑनलाईन पध्दतीचा वापर करण्याचे आवाहन डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे. विमाधारकांनी विमा योजनांचे प्रीमिअम भरण्यासाठी ... या लिंकचा किंवा आयपीपीबी ॲपचा उपयोग करावा. याशिवाय एनएसीएच सुविधेचा उपयोग करुन विमाधारकांच्या बँक खात्यामधून आपोआप कपातीची सुविधा वापरावी. तसेच ज्या विमाधारकांच्या पॉलिसीला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी अद्ययावत नाही अशांनी इंडिया पोस्ट कॉल सेंटरच्या १८०० २६६ ६८६८ या क्रमांकावर किंवा आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये संपर्क साधावा, असे आवाहन डाक अधीक्षक यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय फुटबॉल युथ लिग स्पर्धा

## २८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

फुटबॉल खेळाची शालेय विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होण्यासाठी प्रथमच जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग स्पर्धे चे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा व फुटबॉल क्लबमधील १६ वर्ष वयोगटातील खेळाडूंनी २८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे. फुटबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार समाजातील प्रत्येक खेळाडूंपर्यंत व्हावा यासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग सन २०२४-२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हातील सर्व शाळेतील १६ वर्ष वयोगटातील खेळाडुंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील विविध शाळेतील संघाची नोंदणी जिल्हा क्रीडा कार्यालय बुलढाणा येथे ऑफलाईन विनामूल्य नोंदणी करून संघाची यादी दि. २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत कार्यालयात जमा करून प्रवेश निश्चित करावा. सदर स्पर्धेसाठी खेळाडुंची वयोमर्यादा १ जानेवारी २००९ नंतरचा जन्म झालेला खेळाडु स्पर्धेकरीता पात्र राहील. स्पर्धेची तारीख नंतर कळविण्यात येईल. फुटबॉल युथ लिग स्पर्धेसंदर्भातील अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे किंवा एन.आर. वानखडे (९९६०४३४४८७), डॉ. जे. डब्ल्यु मोहोड(९४०५७३४४०३), मुकेश बाफणा (९४२२८८११०५), एस.एस.केळे(९४२३४४६५१६) यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा क्रीडा कार्यालयाव्दारे कळविण्यात आली आहे.

# दुबईतील अबुधाबी येथे शिवजयंती उत्सवात साजरी

## शिवरायांचा इतिहास प्रेरणादायी आणि स्फूर्तीदायक -केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव






जनसंचलन/ खामगाव

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास प्रेरणादायी आणि समाजाला स्फूर्तीदायक असल्याच प्रतिपादन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी अबुधाबी येथे केले. आखाती देशांमध्ये स्थायिक झालेल्या नवीन मराठी पिढीला इतिहासाची ओळख व्हावी, या दृष्टिकोनातून दुबईतील अबुधाबी येथे इन्स्पायर इव्हेंट अँड प्रमोशन व भारतीय स्थानिक रहिवाशी यांच्या संयुक्त विद्यमाने २३ फेब्रुवारीला बी ए पी एस हिंदू मंदिर अबुधाबी येथे शिवजयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे होते. तर अतिथी म्हणून मालोजी राजे शाहू छत्रपती, खासदार बजरंग सोनवणे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात बोलताना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा गौरवशाली असून आजच्या पिढीला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीमध्ये लोकांच्या हिताची कामे केलीत. अशा स्वरूपाची कामे भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सातासमुद्र पार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव साजरा केला जातो. हे मराठी माणसासाठी आणि आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. यावेळी अबुधाबी येथील मराठी माणसांसोबत त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमाला अबुधाबी येथील मराठी कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुधवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द



जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा रूग्णालयात नियमितपणे बुधवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र बुधवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.

# ५५,२८६ जणांची घरकूल स्वप्नपूर्ती होणार!

## २८,७७६ आभार त्यांच्या खात्यात पहिला हप्ता जमा!



वृत्तसंस्था/ बुलढाणा

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत जिल्ह्यातील ५५,२८६ लाभार्थ्यांना घरकूल मंजुरीचे पत्र वाटप आणि त्यापैकी २८,७७६ लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता केंद्रीय गृहमंत्री ना.अमित शहा यांच्या हस्ते ऑनलाईन वितरित करण्यात आलाय. केंद्रीय गृहमंत्री ना.अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिव छत्रपती संकुल येथे राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना घरकूल मंजुरी पत्र वाटप आणि १० लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरणाचा ङ्मगृहोत्सवफ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, आदी मान्यवर उपस्थित होते. तर जिल्ह्यातून मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपायुक्त श्री कवडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम मोहन, प्रकल्प संचालक राजेश इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य आशिष पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत संजय इंगळे यांच्यासह अधिकारी, तसेच पंचायत समिती स्तरावरून स्थानिक आमदार, गटविकास अधिकारी, तसेच सर्व ग्रामपंचायत स्तरावरुन सरपंच, लाभार्थी, नागरिक ऑनलाईनरित्या सहभागी झाले होते. यावेळी या थेट प्रक्षेपण कार्यक्रमात सहभागी झालेल्या घरकूल लाभार्थ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

# रविकांत तुपकरांची आज तोफ धडाडणार...



जनसंचलन/बुलढाणा

शेतकऱ्यांचे नेते रविकांत तुपकर यांची मुलुख मैदानी तोफ पुन्हा एकदा मंगळवारी बुलढाण्यात धडाडणार आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक २५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्या, समस्या आणि त्यासाठीचे आंदोलन या संदर्भात ही बैठक असून रविकांत तुपकर आता नेमके सरकारवर काय आसूड ओढतात आणि कोणते आंदोलन जाहीर करतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचा पिकविमा, सोयाबीन- कापूस भावफरक, नाफेड मध्ये अडकलेली शेतकऱ्यांची रक्कम, रखडलेले अनुदान यासह इतर विषयांवर चर्चा करण्यासाठी शेतकऱ्यांची महत्वपूर्ण बैठक मंगळवार २५ फेब्रुवारी रोजी बुलढाणा येथील चिखली रोडवर असलेल्या शिवगड हॉटेलमध्ये(जुने गोलांडे लॉन )आयोजित केली आहे. सकाळी १० वाजता ही बैठक होणार आहे. रविकांत तुपकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक होणार असून जिल्हाभरातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते व शेतकरी यांची या बैठकीला उपस्थिती राहणार आहे. पिकविमा व इतर मागण्यांसाठी रविकांत तुपकर यांनी यापूर्वीच मोठे रणकंदन केले आहे. राज्याचे कृषि आयुक्त,कृषी प्रधान सचिव, कृषिमंत्री,पालकमंत्री,उपमुख्यमंत्री तसेच थेट मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन रविकांत तुपकरांनी हा प्रश्न लावून धरला आहे. अद्यापही सरकार या प्रश्नांबाबत सकारात्मक नसल्याने रविकांत तुपकर यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. दरम्यान मंगळवारी होणाऱ्या महत्त्वपूर्ण बैठकीत पिकविमा, सोयाबीन- कापूस भावफरक, नाफेड मध्ये अडकलेली शेतकऱ्यांची रक्कम, रखडलेले अनुदान यासह इतर मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेतला जाणार आहे. यावेळी रविकांत तुपकर सरकारवर कोणती तोफ डागतात आणि कोणत्या आंदोलनाची घोषणा करतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे, त्यामुळे मंगळवारी होणारी बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानासह तत्पर सेवेसाठी कटीबद्ध- संदीप शेळके

## राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या मेहकर शाखा स्थलांतरणाचा उदघाटन सोहळा उत्साहात



जनसंचलन/मेहकर

नव्या बदलांचा स्वीकार करीत सहकार चळवळ दिवसेंदिवस समृद्ध होत आहे. सहकाराच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आणि तत्पर सेवेसाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राजर्षी शाहू मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष संदीप शेळके यांनी केले.राजर्षी शाहू मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटीच्या मेहकर शाखा स्थलांतराचा उद्घाटन सोहळा २३ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. राजर्षी शाहू परिवाराचे संस्थापक भाऊसाहेब शेळके यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. डोणगाव रोडवरील सावजी कॉम्प्लेक्समध्ये हा कार्यक्रम झाला. महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करुन कार्यक्रमास सुरवात झाली. संस्थाध्यक्षा मालतीताई शेळके यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या आजपर्यंतच्या वाटचालीचा लेखाजोखा मांडला. संस्थेच्या यशात खातेदार, ठेवीदार, ग्राहक, सभासदांचे मोठे योगदान असल्याचे भाऊसाहेब शेळके यांनी सांगितले. इतर मान्यवरांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. संस्थापक अध्यक्ष संदीप शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त राजर्षी शाहू परिवार आणि वन बुलढाणा मिशनच्यावतीने रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. यानुषंगाने आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास महाराष्ट्र अर्बनचे अध्यक्ष ऋषीकेश जाधव, माजी जि. प. सदस्य आशिष रहाटे, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव, शहराध्यक्ष किशोर गारोळे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय घनवट, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या संचालिका डॉ. माधवी जवरे, प्रशांत सावजी, कलीम खान, कैलास जाधव, सारंग माळेकर, लक्ष्मण मंजुळकर, भास्करराव काळे, गजानन धोंडगे, श्रीकृष्ण देवकर, गणेश देवकर, गजानन कृपाळ, स्वप्नील काळे, प्रा. अनिल ढगे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. संचालन विभागीय व्यवस्थापक गोविंद येवले यांनी केले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रू. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४